# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

## नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

**दिनांक ०६.१०.२०२५ सोमवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, ड्रंकन ड्राईव्ह कायद्या अंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०५.१०.२०२५ रोजी नागपूर शहर पोलीसांनी, सर्व पोलीस ठाणे हद्दीत **महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये ०३ केसेस तसेच, एन.डी.पी.एस कायद्यान्वये ०२ केसेस असे एकुण ०५ कसेसेमध्ये ०८ ईसमावर कारवाई करून रू. ९,०७,८४०/— चा** मुद्देमाल जप्त केला. **महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये ०१ केसेसमध्ये ०५ ईसमावर कारवाई करून रू. १,२७०/— चा** मुद्देमाल जप्त केला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकुण ८१० वाहन चालकांवर कारवाई करून एकूण रू. १,२७,३५०/— रू. तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) राणाप्रताप नगर पोलीसांची कामगिरी :— गांजा बाळगणाऱ्या आरोपीना अटक.**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर — एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे व जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द वेगवेगळ्या कारवाई सुरू आहेत. त्याअन्वये दिनांक ०४.१०.२०२५ चे २३.०० वा. चे सुमारास, राणाप्रताप नगर पोलीसांचे तपास पथक पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, गायत्री नगर, एन.पी.टी.आय जवळील गल्लीमध्ये एक ईसम संशयीतरित्या वावतांना दिसुन आल्याने त्यास हटकले असता, तो पोलीसांना पाहुन पळुन जावू लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले व त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव आकाश दिपक बोदाडे, वय २६ वर्षे, रा. कामगार कॉलोनी, व्ही.आय.पी.एल. बिल्डींग मागे, सुभाष नगर, नागपूर असे सांगीतले. त्याचे जवळील पिशवीची पंचासमक्ष पाहणी केली असता त्यामध्ये गांजा मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन गांजा वजनी २८० ग्रॅम व ०२ मोबाईल फोन असा एकुण किंमती अंदाजे १७,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता गांजा विक्री करण्याचे उद्देशाने आपले जवळ बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपीचे कृत्य हे कलम ८(क), २०(ब)(२)(अ) एन.डी.पी.एस. अ‍ॅक्ट नुसार होत असल्याने, आरोपीविरूध्द पोलीस ठाणे राणाप्रताप नगर येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. सिंगा रेड्डी ऋषीकेश रेड्डी, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. १), मा. श्री. अशोक शेळके सहा. पोलीस आयुक्त (सोनेगाव विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. पंकज बोडसे, पोहवा. दिनेश भोगे व त्यांचे पथकाने केली.

(गुन्हे)

**१) पोलीस ठाणे पाचपावली :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०६.१०.२०२५ चे ०२.४० वा. ते ०३.३५ वा. चे सुमारास, पाचपावली पोलीसांचे तपास पथक पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, झेंडा चौक, कुऱ्हाडकर पेठ, पिंपळाचे झाडाजवळ एक ईसम शस्त्रासह वावरत आहे. अशा माहितीवरून नमुद ठिकाणी गेले असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचा ईसम हा पोलीसांना पाहुन पळु जात असता, त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव अतुल प्रभाकर मेंढे, वय ३५ वर्षे, रा. लष्करीबाग, धार्मीक राशन दुकान जवळ, पाचपावली, नागपूर असे सांगीतले. त्याची पचासमक्ष झडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे आत कमरेत एक लोखंडी चाकु किंमती अंदाजे ६००/— रू. चा मिळुन आल्याने, तो जप्त करण्यात आला. आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगुन मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, फिर्यादी पोहवा. ईमरान शेख यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पाचपावली येथे पोउपनि. थोटे ८५३०८४७९७० यांनी आरोपीविरूध्द कलम ४/२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे अजनी :— प्राणांतीक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०५.१०.२०२५ चे २२.०० वा. ते २२.३० वा. चे सुमारास, फिर्यादीचा चुलत भाऊ नामे प्रसाद अशोक काळे, वय ३४ वर्षे, रा. प्लॉट नं. ५०, वंजारी नगर, अजनी, नागपूर हे त्यांची काळ्या रंगाची दुचाकी क्र. एम.एच. ४९ सि.ई. ८१८५ ने पोलीस ठाणे अजनी हद्दीत, वंजारी नगर कडुन मेडीकल चौक कडे जात असता, वंजारी नगर पाण्याचे टाकी जवळ एका अज्ञात चार चाकी वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायरित्या चालवून फिर्यादीचे भावाचे गाडीला मागून धडक देवून, गंभीर जखमी करून पळून गेला. जखमी यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल, ट्रामा सेंटर येथे नेले असता, उपचारादरम्यान डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी श्रीपाद शांताराम काळे, वय ३८ वर्षे, प्लॉट नं. ५६, मेडीकल चौक, हनुमान नगर, अजनी, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे अजनी येथे मपोउपनि. जांभळे ७३८५४०५५०४ यांनी अज्ञात चार चाकी वाहन चालक आरोपीविरूध्द कलम १०६(१), २८१ भा.न्या.सं., सहकलम १३४, १७७, १८४ मो.वा.का अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे बेलतरोडी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०५.१०.२०२५ चे ११.०० वा. ते १४.४५ वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत, प्लॉट नं. ९७, जयदुर्गा सोसायटी नं. ६, हनुमान मंदीर जवळ, प्रभू नगर, नागपुर येथे राहणारे फिर्यादी रोहन श्रीराम खोंडे, वय ३८ वर्षे, हे त्यांचे राहते घराला कुलुप लावुन परिवारासह नातेवाईकाचे लग्न कार्यक्रमाकरीता कुसुमताई वानखेडे हॉल, धरमपेठ येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडीकोंडा तोडुन, घरात प्रवेश करून बेडरूम मधील आलमारीतील रोख ३०,०००/—रू., सोन्याचे वेगवेगळे दागिने वजनी ५२ ग्रॅम व चांदीचे दागिने वजनी १५० ग्रॅम असा एकुण २,१०,०००/— रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे पोउपनि. घोडके ९२६०६२८०१० यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

स्वा/–

(अंकुश उ. राठोड)

पोलीस उप–निरीक्षक,

पोलीस जनसंपर्क अधिकारी,

नागपुर शहर.